# शासकीय तंत्रनिकेतन जालना

जालना- छत्रपती संभाजीनगर रोड, नागेवाडी, जालना जि.जालना

Ph No. 02482 - 299099

E_Mail : principal.gpjalna@dtemaharashtra.gov.in

Web Address: www.gpjalna.ac.in

DTE CODE - 2014 | AICTE ID: 1-804497011 | MSBTE CODE - 0120

जा. क्र. शातनिजा/ सुरक्षारक्षक/२०२६/ 2163 दि. 11 SEP 2026

## सुरक्षारक्षक सेवा पुरविण्यासाठी ई-निविदा

शासकीय तंत्रनिकेतन, जालना या संस्था परिसरामधील सर्व इमारती, व्यायामभूमी, उद्याने, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, विद्युत ट्रॉन्सफार्मर व जनरेटर सेट, प्रेक्षागृहे, कर्मचारी यांचे निवासस्थाने, कर्मचारी व विद्यार्थी यांची वाहने इ. ची सुरक्षा करणेसाठी सुरक्षारक्षक सेवा पुरविणाऱ्या (एजन्सीकडुन) बाह्य यंत्रणेव्दारे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| १. | सुरक्षारक्षक संख्या | **०९ सुरक्षारक्षक (०६ पुरुष व ०३ महिला)** |
| २. | निविदा फॉर्मची किमत | रु. १५००/- ना परतीची रक्कम |
| ३. | बयाणा रक्कम रुपये (EMD) | रु. १,००,०००/- (एक लक्ष रुपये मात्र) परतीची रक्कम |
| ४. | निविदा फॉर्मची किंमत अदा करणेसाठी | स्टेट बँक ऑफ इंडिया – नागेवाडी, जालना<br>खाते क्र. 52136050202 (IFSC कोड SBIN0020506)<br>फक्त NEFT/RTGS व्दारे |
| ५. | बयाणा रक्कमेची डीडी काढणे | प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना Payable at जालना |
| ६. | निविदा ऑनलाईन पध्दतीने GeM Portal वर भरण्याची तारीख | १५/०९/२०२६ |
| ७. | निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम तारीख | २९/०९/२०२६ |
| ८. | सादर करावयाच्या सर्व कागदपत्रांचा तपशिल निविदेत दिलेला आहे. ती सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबतच अपलोड करण्यात यावे. | |
| ०९. | तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख दि. ३०/०९/२०२६ | |

१. निविदा फॉर्मची किंमत NEFT/RTGS व्दारे बँकेत जमा केल्याची पावती व बयाणा रक्कमेची पावती स्कॅन करुन निविदेतील तांत्रीक लिफाफ्यात Technical Bid मध्ये सादर करावी.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांनी निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

३. निविदेमध्ये भरलेले दर अंतिम राहतील.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, जालना

## निविदेच्या अटी व शर्ती

१. सुरक्षारक्षक सेवा पुरविणेसाठी निविदा ऑनलाईन पध्दतीने **GEM Portal** वरुन भरावयाची आहे

२. निविदा फी रु. १५००/- प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया – नागेवाडी, जालना खाते क्र.**52136050202** (IFSC कोड **SBIN0020506**) फक्त **NEFT / RTGS** द्वारे जमा करुन प्राप्त होणारी पावती स्कॅन करुन निविदेसोबत अपलोड करावे.

३. **Earnest Money Deposit (EMD)** बयाणा रक्कम रु. १,००,००० (एक लक्ष रुपये मात्र ) राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. **PRINCIPAL, GOVERNMENT POLYTECHNIC, JALNA PAYABLE AT JALNA** यांचे नावाने काढून बयाणा रक्कम भरल्याबाबतचे डी.डी. निविदेसोबत **Scan** करुन अपलोड करावे.

४. निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहे. **Hard Copy** मध्ये किंवा ऑफलाईन पध्दतीने सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

५. अपूर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाही.

६. निविदा फी व बयाणा रक्कम भरले शिवाय सादर केलेल बीड ऑफ कोटेशन **(BOQ)** चे कागदपत्र उघडले जाणार नाही

७. सर्व आवश्यक सुचविलेले प्रमाणपत्र निविदेसोबत ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

८. **Technical Bid** चे प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व फर्मचा शिक्का असावा.

९. शासकीय सेवेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असलेल्या व्यक्ती कडुन निविदा स्विकारले जाणार नाही.

१०. **कंत्राट प्राप्त झाल्यानंतर संबंधित पुरवठादारास रु. १,००,०००/- एक लक्ष रुपये बयाना रक्कम सात दिवसाचा आत प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचे कार्यालयास NEFT / RTGS स्वरुपात जमा करणे अनिवार्य राहील. तसेच यामध्ये कोणालाही कोणत्याही प्रकारची सुट मिळण्यार नाही. अन्यथा कंत्राट रद्द करण्यात येईल.**

११. **कार्यदेश प्राप्त झाल्यानंतर १० दिवसांचे आत करारनामा रु. १००/- चा गैरन्यायिक स्टॅम्प पेपरवर करारनामा लिहून नोटरी करुन दयावे लागेल. करारनामा करुन दिला नाही अथवा टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेचा अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे राखुन ठेवला आहे.**

१२. कंत्राटदाराने मध्येच सेवा समाप्त केल्यास अथवा त्याच्या सेवा असमाधानकारक आढळल्यास त्यांचे कंत्राट रदद करुन शासनास होणारा भुर्दंड करारनाम्यासोबत दिलेल्या हमी पत्रानुसार बयाना रक्कमेतुन वसुल करण्यात येईल.

१३. **कंत्राटदारास सुरक्षारक्षक सेवा पुरविण्याबाबत कंत्राट प्राप्त झाल्यानंतर निविदेत नमुद केल्याप्रमाणे ०६ पुरुष सुरक्षारक्षक व ०३ महीला सुरक्षारक्षकांच्या सेवा देणे बंधनकारक राहील. असे पालन झाले नाही तर कंत्राट रदद करण्यात येईल.**

१४. निविदा दर हे निविदा मंजुर झाल्यापासुन ११ महिन्यापर्यंतच वैध राहील

१५. कामाची गुणवत्ता पाहुन मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांना राहील.

१६. सदरील निविदा बाबत कसलाही वाद उपस्थित झाल्यास याबाबत न्यायालयीन कार्यक्षेत्राकरीता जालना मुख्यालय राहील.

१७. निविदाधारकाची कसलीही अट व शर्त मान्य करण्यात येणार नाही.

१८. निविदेतील दरात साम्य असल्यास त्याबाबत अंतिम निर्णय प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांचा राहील.

१९. किमान वेतन अधिनियम १९४८ चा भंग सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडुन होणार नाही याची दक्षता बाळगावी लागेल.

२०. सुरक्षा रक्षक हे शारीरीक दृष्ट्या सक्षम व २१ ते ५० वर्ष या वयोगटातील तसेच चांगल्या वर्तणुकीचे असणे आवश्यक आहे.

२१. सुरक्षारक्षक शासकीय सेवेद्वारे मिळणाऱ्या हक्कास पात्र राहणार नाहीत. सुरक्षारक्षक हे या संस्थेच्या आस्थापनेवरील कर्मचारी नसल्यामुळे त्यांच्या सुट्ट्या व इतर फायदे यांचा या कार्यालयाशी संबंध असणार नाही व हा करार संपुष्टात आल्यानंतर सुरक्षा रक्षकांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२२. सुरक्षारक्षकांच्या पी.एफ. वर्गणीची नियमित कपात करण्यात यावी. त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील त्यास प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना जबाबदार राहणार नाही.

२३. सुरक्षारक्षक सुटीवर गेल्यास त्याच्या जागी पर्यायी व्यवस्था करणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील व त्याचे मानधन या संस्थेकडुन देय राहणार नाही.

२४. सुरक्षारक्षकांचे गणवेश, बूट, रेनकोट, काठी, बॅटरी व ओळख पत्र इत्यादी सुरक्षारक्षकास आवश्यक साहित्य कंत्राटदारामार्फत पुरवून, साहित्यासह सुरक्षारक्षक कर्तव्यावर हजर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. सुरक्षा रक्षकाच्या करारातील मोबदल्या व्यतीरिक्त इतर कसलेही मानधन अथवा भत्ते या संस्थेकडून देय राहणार नाही.

२५. **GeM Portal द्वारे निवड झालेल्या L1 कंत्राटदाराने काम करण्यास नकार दिल्यास एक किंवा एकापेक्षा जास्त निविदाधारकांची दर समान असल्यास त्यांपैकी एकाची निवड ही ईश्वर चिठ्ठी मार्फत संस्थास्तरावर करण्यात येईल.**

२६. सुरक्षारक्षक मद्यपान अथवा तत्सम अमली पदार्थ सेवन करुन कर्तव्यावर हजर राहणार नाहीत याची हमी कंत्राटदाराने देणे बंधनकारक आहे किंवा कर्तव्यावर हजर असतांना झोपलेले अवस्थेत आढळल्यास त्यास त्वरीत कामावरून कमी केले जावून व त्या सुरक्षारक्षका ऐवजी पर्यायी सुरक्षारक्षकाची नियुक्तीची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. गैरवर्तनाच्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल.

२७. **कंत्राटदाराने पुरविण्यात आलेले सुरक्षारक्षक हे गुन्हेगारी पार्श्वभुमीचे नाहीत असे हमीपत्र देणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील. तसेच त्या सर्व सुरक्षारक्षक यांची पोलीस व्हेरीफिकेशन प्रमाणपत्र या संस्थेस सादर करणे बंधनकारक राहिल**

२८. या संस्थेस पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षक किमान ३ वर्षाचा सुरक्षा रक्षक म्हणून काम केलाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२९. नेमलेल्या सुरक्षा रक्षकांची माहिती व फोटो दिलेल्या प्रपत्रात भरुन कंत्राटदारास दयावे लागेल.

३०. कामावर असतांना सुरक्षा रक्षकांस अपघात अथवा इजा अथवा मृत्यु झाल्यास त्याची जबाबदारी दायीत्व / इतर कसलीही जबाबदारी या संस्थेची राहणार नाही. त्यामुळे उदभवल्यास सर्व बाबींसाठी सर्वस्वी जबाबदार कंत्राटदार राहील.

३१. या करार कालावधीत शासकीय मालमत्तेचे नुकसान/ चोरी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील व नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदारास भरणे बंधनकारक राहील.

३२. कोणताही सुरक्षा रक्षक त्याच्या पुढील पाळीवरील सुरक्षारक्षक येईपर्यंत आपली जागा सोडणार नाही याची जबाबदारी घ्यावी लागेल व नेमून दिलेले सुरक्षा रक्षक कर्तव्यावर आहेत किंवा कसे या बाबत वेळोवेळी आकस्मिक भेट देऊन सुरक्षारक्षकावर व त्यांच्या कर्तव्यावर नियमितपणे नियंत्रण ठेवणे बाबतचा अहवाल दर पंधरा दिवसानी नियंत्रण अधिका-यास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कोणत्याही एका सुरक्षारक्षकास आठ तासापेक्षा जास्त सेवा (कर्तव्यावर)राहू नाही यकरीता बदली सुरक्षारक्षकाची व्यवस्था कंत्राटदाराने करावी.

३३. सुरक्षारक्षकांचे पाळीनिहाय हजेरीपत्रक देयकासोबत जोडणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

३४. सुरक्षारक्षकांचे पाळीनिहाय नियोजन ८ दिवस अगोदर नियंत्रण अधिका-यास सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

३५. सुरक्षा रक्षकाचे वेतन देयके शासनाकडून प्राप्त उपलब्ध अनुदानानुसार / निधीनुसार पारीत करण्यात येईल. अनुदान प्राप्त झाले नसल्यास देयके पारीत होणा-या विलंबास संस्था जबाबदार राहणार नाही व याबाबत कंत्राटदारास कोणतेही तकार / हरकत दावा करता येणार नाही.

३६. कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षक प्राप्त परीस्थितीनुसार कमी जास्त करण्यांचा अधिकार प्राचार्यांना राहील प्राप्त व पारीत करण्यांत येणारी देयके हे त्या कालावधीतील पुरविण्यांत येणा-या सुरक्षारक्षकांच्या संख्येवर अवलंबून राहील. याबाबत कोणतीही तक्रार / हरकत कंत्राटदारास करता येणार नाही.

३७. कार्यादेश प्राप्त करण्यासाठी पुरविणा-या सुरक्षा रक्षकाची संपुर्ण माहिती (बायोडाटा) कंत्राटदाराने नियंत्रण अधिका-याकडून पडताळणी करुन घ्यावी लागेल. तसेच बदली सुरक्षा रक्षक दयावयाचा असल्यास त्याची पुर्ण मान्यता नियंत्रण अधिकारी यांचेकडून घ्यावी लागेल. वरील सर्व बाबींची पुर्तता झाल्याशिवाय कार्यादेश व त्या कालावधीत महीन्याचे देयक पारीत करण्यात येणार नाही याची कंत्राटदाराने नोंद घ्यावी.

३८. सेवा पुरवठादाराने सेवा देण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीस या संस्थेमार्फत नियमित करण्याकरीता व भविष्यातील भरावयाच्या पदावर कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा/ हक्क सांगता येणार नाही. तसे झाल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदारास जबाबदार धरण्यात येवून त्या संदर्भात सर्व कायदेशीर बाबी कंत्राटदार यांना हाताळणे बंधनकारक राहील. या संदर्भात सेवा पुरवठादाराने

सोबत दिलेल्या प्रपत्र (ब) मध्ये कामावर ठेवल्यास येणा-या प्रत्येक सुरक्षारक्षकाकडुन ५००/- रुपयाचा स्टँप पेपरवर हमीपत्र देवुन नोटरी करुन संस्थेत सादर करणे बंधनकारक राहील.

३९. मुलींच्या वसतिगृहासाठी महीला सुरक्षारक्षक यांची नियुक्ती करणे बंधनकारक राहील.

४०. **सुरक्षारक्षक सेवा पुरविण्यारा संस्थेचे कार्यालय / आस्थापना जालना अथवा छत्रपती संभाजीनगर येथे असावे तसेच असल्याचा पुरावा निविदेसह जोडणे बंधनकारक आहे.**

४१. **कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन जालना यांचेकडे राखुन ठेवले आहेत.**

४२. **वरीलपैकी कोणतेही अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा / स्वीकारण्याचे / अस्विकारण्याचे सर्व अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन जालना यांना राहील.**

## कामाचे स्वरूप

१. सुरक्षारक्षकाच्या कामाच्या वेळा आठ तासाच्या पाळीमध्ये ठेवण्यात येतील व सुरक्षा रक्षकांचा कामकाजाचा कालावधी आठ तासापेक्षा जास्त नसावा. सुरक्षारक्षकास नेमुन दिलेल्या ठाव्यावर नियमितपणे काम करावे लागेल.

२. सुरक्षारक्षकास संस्थेतील शासकीय मालमत्तेचे संरक्षण करणे. (संस्था परिसरामधील सर्व इमारती, यंत्रसामुग्री, उद्याने, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, विदयुत टॉन्सफार्मर व जनरेटर सेट, प्रेक्षागृहे, कर्मचारी यांचे निवासस्थाने, कर्मचारी व विदयार्थी यांची वाहने इत्यादींची सुरक्षा व आदींचा समावेश होतो.)

३. संस्थेमधील विद्यार्थ्यांवर शिस्तीबाबत नियंत्रण ठेवणे व अनधिकृत विद्यार्थ्यांवर वचक ठेवणे.

४. संस्थेच्या आवारात संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तु आढळल्यास याबाबत योग्य कार्यवाही करणे व वरिष्ठांना वेळीच माहिती देणे.

५. संस्थेतील अधिकऱ्यांनी दिलेले निर्देश पाळणे व प्रसंगी अधिकाऱ्यांना संरक्षण देणे. सायंकाळी ६.०० पासुन सकाळी ६.०० पर्यंत प्रत्येक तासाला टोके देणे.

६. कार्यालयीन वेळेनंतर आणि सुटीच्या दिवशी दुरध्वनी / टपाल / संदेश आल्यास तो घेणे व वरिष्ठांना त्वरीत कळविणे.

७. ०१ सुरक्षा रक्षकांपैकी एक सुरक्षा रक्षक सर्प मित्र असावा.

८. कामावर असणाऱ्या सुरक्षा रक्षकांनी संस्थेतील आणि वसतिगृहातील पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी भरण्याचे नियोजन करणे.

९. सुरक्षारक्षकांच्या कामकाजाचे स्वरूपामध्ये बदल करण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, जालना यांचेकडे राहतील.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, जालना

खालील तपशिलाप्रमाणे तांत्रिक कागदपत्राची Technical Bid स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करावेत.

## प्रपत्र "अ"

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशिल | जोडले असल्यास √ मार्क करावे |
|---|---|---|
| ०१ | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ च्या अंतर्गत नोंदणी असल्याचा दाखला/ प्रमाणपत्र **(Shop Act Certificate)** | |
| ०२ | संस्थेच्या पात्रता व आर्थिक उलाढाल क्षमतेसाठी संस्थेचे मागील ३ वर्षाचे सी. ए. कडून तपासणी झालेल्या अहवालाच्या सत्यप्रती (Audit Report of year 2023 -24, 2024-25, 2025-26) | |
| ०३ | निविदा फी NEFT/RTGS व्दारे भरल्याची पावती | |
| ०४ | बँकेकडील किमान १० लक्ष रुपयांचे संस्थेच्या नावे असलेले सॉल्व्हन्सी (Solvency) प्रमाणपत्र **( ०१ एप्रिल २०२६ नंतरचे)** | |
| ०५ | बयाणा रकमेचा डीडी काढून अपलोड करावा | |
| ०६ | संस्था काळया यादीत नसल्याचे निबंधकाचे प्रमाणपत्र अथवा रू.१००/- च्या स्टँप पेपर वर नोटरी केलेले शपथपत्र जोडावे. | |
| ०७ | भविष्य निर्वाह निधी नोंदणी दाखला **(EPF Certificate)** | |
| ०८ | ठेकेदारची किंवा संस्थेची मागील ३ वर्षाची उलाढाल प्रत्येक वर्षाला २५ लाखाचे वर असणे गरजेचे आहे व तसे सी.ए. चे प्रमाणपत्र | |
| ०९ | केंद्रशासन / राज्य शासन अथवा यांची अंगीकृत असलेली मंडळे याना सुरक्षारक्षक सेवा किमान ५ वर्ष पुरविल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र | |
| १० | सुरक्षारक्षक सेवा पुरविण्यारा संस्थेचे कार्यालय / आस्थापना जालना अथवा छत्रपती संभाजीनगर येथे असल्याचा पुरावा निविदेसह जोडणे अनिवार्य आहे. | |
| ११ | Private Security Regulations Act (PSRA) नुसार अधिकृत असल्याचे **महाराष्ट्र राज्य गृह विभाग अथवा पोलीस अधिक्षक** यांचे **पसारा** प्रमाणपत्र अनिवार्य आहे. | |
| १२ | ठेकेदारी पध्दतीने कामगार पुरवठा करण्याचा कंत्राट कामगार कायदा (आर अँन्ड ए) १९७० नुसार वैध परवाना | |
| १३ | Central board of excise and customs certification / वस्तू व सेवा कर रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र **(GST Certificate)** | |
| १४ | संस्था / संस्था चालकाच्या पॅन कार्डची सत्यप्रत | |
| १५ | Implementation of ESI act-1948 and registration of employee of factory and establishment under section 1(5) of the act as amended नुसार नोंदनीकृत दाखला **(ESIC Certificate)** | |
| १६ | सुरक्षारक्षकांचा सहा महिन्यापर्यंत अथवा शासनाकडून अनुदान उपलब्ध होईपर्यंत चा पगार देण्याची क्षमता कंत्राटदाराकडे असल्याचे संस्था चालकाचे लेटर हेड वरील शपथपत्र सादर करावे. | |
| १७ | सध्या काम करत असलेल्या कामाविषयीचे कार्यदेशाच्या सत्यप्रती (किमान २ आवश्यक ) | |

टिप :- वरील पैकी कोणतेही कागदपत्र लागू नसल्यास / त्यात सुट असल्यास त्या बाबतचे खुलासा करणारे कागदपत्र निविदेतील कागदपत्रा सोबत ऑनलाईन अपलोड करावेत. वरील कागदपत्राव्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नयेत.

## प्रपत्र - ब

कंत्राटी तत्वावर सुरक्षारक्षक कामाकरीता सेवा पुरविणा-या कंत्राटदाराने कामावर ठेवण्यात येणा-या सुरक्षारक्षकाकडून १०० रुपये च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून घ्यावयाचे हमीपत्र.

## हमीपत्र

मी. ------------------------------------------------------------------------

संपुर्ण पत्ता --------------------------------------------------- असे लिहुन देतो/देते

की, मी ------------------------------------------ या कंत्राटदारामार्फत स्वेच्छेने स्विकारलेल्या सुरक्षारक्षक या कामाकरीता संबधीत यंत्रणेच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. जर माझ्या कडुन अटी व शर्तीचा भंग झाला तर कंत्राटी स्वरूपाच्या कामावरुन काढल्यास मी स्वतः जबाबदार राहील.

तसेच मी स्वेच्छेने स्विकारलेल्या सुरक्षारक्षक या कंत्राटी स्वरूपाच्या कामादरम्यान तसेच करार संपल्यावर मला कायमस्वरूपी नियुक्ती मिळण्याचा हक्क राहणार नाही तसेच सदर सेवेबाबतची कंत्राटदार तसेच शासनावर (संबंधित शासकीय यंत्रणेवर) कोणतेही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राटी सेवेशी निगडीत कायम नियुक्ती संदर्भात मी कोणत्याही नायालयात कोणताही प्रकारचा दावा व हक्कासाठी मागणी करणार नाही अशी हमीपत्राव्दारे मी हमी देत आहे.

दिनांक :- स्वाक्षरी :-

ठिकाण :- नाव :-

पत्ता :-

मी कंत्राटदार --------------------------------------------- लिहुन देतो की, वरील प्रमाणे मी कामावर ठेवण्यात आलेले सुरक्षारक्षक श्री.---------------------------------- यांचेकडुन हमीपत्र माझे समक्ष लिहुन घेतलेले असून सदर हमीपत्राचे संबधीताकडुन भंग झाल्यास सदर बाबी संदर्भात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याबाबत सर्व बाबी हाताळण्यास मी स्वतः जबाबदार राहील.

दिनांक :- स्वाक्षरी :-

ठिकाण :- कंत्राटदाराचे नाव :-

शिक्का :-

# " प्रपत्र - क "

## निविदाधारकाची माहिती

१) निविदा धारकाचे एजन्सीचे नाव :- ........................................................................

२) मालकाचे / भागीदाराचे नाव व संपूर्ण पत्ता :-

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

३) मोबाईल नंबर:- ........... .....

ईमेल :- ..........................

४) संपर्कासाठी प्रतिनिधीचे नाव :- ........................................ मोबाईल नंबर :- ...............

५) जीएसटी नोंदणी नंबर :- ..............................

६) मनुष्यबळाची संख्या ...................... स्त्री.............. पुरुष...........

७) या व्यवसायासंबंधी प्रलंबित खटला / निर्बंधाबाबतची माहिती ......................................

८) सदर प्रकारची सेवा या पुर्वी / सद्यपरिस्थितीत किती व कोणत्या प्रतिष्ठाणाकरीता देत आहे त्याचा तपशील

:........................................................................................................

........................................................................................................

९) प्रति वर्ष व्यवसायाचा उलाढाल / टर्नओव्हर ..............................................

१०) आयकर पॅन नंबर.......................

११) आधारकार्ड नंबर ..............

१२) बँक खाते क्रमांक...................

१३) आयएफएससी कोड.......................

मी खालील सही करणार असे शपथपुर्वक प्रमाणित करतो की, वर नमुद करण्यात आलेली माहिती खरी आहे खोटी आढळल्यास होणाऱ्या परीणामाची जबाबदारी माझी राहील. तसेच सदर कंत्राटासाठी आपण निविदा प्रपत्रात नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

स्थळ -

निविदाधारकाची सही व शिक्का

दिनांक -

# “ प्रपत्र – इ ”

## घोषणापत्र

(काळया यादीत नसल्याबाबत)

मी / आम्ही मे ................................................................ कंत्राटदार असे जाहीर करतो की, आमची संस्था मे............................................................................ ला महाराष्ट्र राज्य किंवा इतर कोणत्याही सरकारी संस्थेने निविदेत भाग घेण्यासाठी मागील पाच वर्षात काळ्या यादीत टाकलेली नाही. किंवा निविदा प्रकीयेत सहभाग घेण्यासाठी बंदी घातलेली नाही. तसेच संस्था / संस्था चालक यांच्या विरुध्द कोणत्याही खटला प्रलंबित नाही.

स्वाक्षरी ............................

नाव ............................

संस्थेचे नाव व पत्ता .............................................

संस्थेचा शिक्का .............................

दिनांक ............................